आकाशवाणी पुणे
प्रादेशिक वृत्तविभाग
राष्ट्रीय बातमीपत्र
सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

दिनांकः21.06.2025 **वारःशनिवार**

---

1. योगानं संपूर्ण विश्वाला जोडलं आहे हे बघणं अत्यंत सुखद असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन / जगभरात आंतरराष्ट्रीय योग दिनाचा उत्साह
2. नाफेड लवकरच शेतकऱ्यांकडून थेट शेतमाल खरेदी करणार असल्याची केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा यांची घोषणा
3. संत श्री ज्ञानेश्वर महाराज आणि संत श्री तुकाराम महाराज यांच्या पालख्यांचं पुण्यनगरीत उत्साहात स्वागत
4. पॅरिस डायमंड लीग 2025 मध्ये पुरूषांच्या भालाफेक स्पर्धेत नीरज चोप्राची विजेतेपदाला गवसणी आणि
5. इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेतल्या पहिल्या सामन्यात भारतीय फलंदाजांची दमदार सुरुवात

<u>पंतप्रधान-योग दिवस</u>

योग म्हणजे जोडणे. आज योगानं संपूर्ण विश्वाला जोडलं आहे हे बघणं अत्यंत सुखद आहे असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. विषाखापट्टणम मध्ये आज 11 व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्यांनी देश -विदेशांतल्या नागरिकांना संबोधित केलं. सुरुवातीला त्यांनी सगळ्यांना योग दिनाच्या शुभेच्छा दिल्या. संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेत 21 जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिवस म्हणून साजरा करण्याचा प्रस्ताव मांडला, त्यावेळी 175 देशांनी या प्रस्तावाला समर्थन दिलं. ही केवळ एक प्रतिक्रिया नव्हती तर मानवतेच्या भल्यासाठी संपूर्ण विश्वाचा एक सामूहिक प्रयत्न होता असं त्यांनी सांगितलं. योग निरोगी ,संतुलित आणि अधिक अर्थपूर्ण जीवनाचा मार्ग दाखवतो. योग सगळ्यांसाठी आहे असा संदेश आज जगाच्या कानाकोपऱ्यांतून येत असल्याचं पंतप्रधानांनी नमूद केलं. आयुष मंत्रालयाच्या वतीनं आयोजित या कार्यक्रमाला केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव, आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. 3 लाख योगसाधक या कार्यक्रमात सहभागी झाले होते.

11व्या आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आज सकाळपासून जगभरात विविध ठिकाणी योग प्रात्यक्षिकांचं आयोजन करण्यात आलं आहे. 'एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग' अशी यंदाच्या योग दिनाची संकल्पना आहे. सांस्कृतिक मंत्रालयानं देशभरातल्या 100 पर्यटन स्थळांवर आणि 50 सांस्कृतिक स्थळांवर योग प्रात्यक्षिकांचं आयोजन केलं आहे. युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांचा समावेश असलेल्या आसाममधील चराईदेव मैदाम, गुजरातमधील राणी की वाव आणि धोलावीरा, कर्नाटकमधील हंपी आणि पट्टडकल, मध्यप्रदेशातील खजुराहो स्मारके आणि सांची स्तूप, ओडिशातील कोणार्क इथलं सूर्य मंदिर, महाराष्ट्रातील वेरूळ लेणी आणि तामिळनाडूमधील

तंजावर इथल्या बृहदीश्वर मंदिर आदि ठिकाणी योग दिन साजरा करण्यात येत आहे. आजच्या विशाल योगसंगम कार्यक्रमासाठी देश- परदेशातून नोंदणी केलेल्या योग अभ्यासकांची संख्या 10 लाखांच्या पुढे गेली आहे.

योग दिन

आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आज पुण्यात केंद्र आणि राज्य सरकारची विविध कार्यालयं आणि खासगी संस्था, संघटनांनी योग प्रात्यक्षिकं सादर केली.केंद्रीय संचार ब्युरोच्या वतीनं आजपासून तीन दिवस बहुमाध्यम चित्र प्रदर्शनाचं आयोजन करण्यात आलं आहे. पंढरपूरच्या वारीच्या पार्श्वभूमीवर आज महाराष्ट्र सरकारच्या पुढाकारानं 'वारकरी भक्तीयोग उपक्रम' आयोजित करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या या उपक्रमात वारकरी, विद्यार्थी, आणि योग अभ्यासक एकत्रितपणे योगसाधना करणार आहेत. योग केवळ शारीरिक व्यायाम नसून, आपल्या मन आणि आत्म्याला शांती प्रदान करणारी एक जीवनशैली आहे. ऐकुयात एक संदेश....

कुछ लोग सोचते हैं योग के लिए फ्लेक्सिबिलिटी चाहिए लेकिन फ्लेक्सिबिलिटी तो सोच में होनी चाहिए ना, ना कोई बंधन, ना कोई बॉडी टाइप बचपन हो या पचपन, व्हील चेअर हो या वर्क फ्रॉम होम, योग सबका हक है... योग जीवन से जब जुडता है, एक सहज क्रिया बन जाता है, तो वो प्रतिफल उसका बेनिफिट देता रहता है... आइये इस इक्कीस जून हम सब हिस्सा बने अंतरराष्ट्रीय योग दिवस का और करे स्ट्रेच एंड चिल योग के साथ...

शहा-कृषी

कृषी उत्पादनाच्या प्रक्रियेतले मध्यस्थ दूर करून, नाफेड लवकरच शेतकऱ्यांकडून खरेदी करायला सुरुवात करणार असल्याची घोषणा केंद्रीय गृह आणि सहकारिता मंत्री अमित शहा यांनी केली आहे. आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त आयोजित राष्ट्रीय परिसंवादात ते काल मुंबईत बोलत होते. यामुळे शेतकऱ्यांना उत्पादनाची योग्य किंमत मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सरकार लवकरच सहकार सूत्रावर आधारित विमा कंपनीही सुरू करणार असल्याचं ते म्हणाले. देशभरात दोन लाख नव्या प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था स्थापन करणार असल्याची माहिती शहा यांनी यावेळी दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी बोलताना महाराष्ट्राला लाभलेला 120 वर्षांचा सहकार चळवळीचा इतिहास अधोरेखित केला. देशाची अन्नसुरक्षा अबाधित राखणं, शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढवणं, देशवासीयांना पोषणयुक्त आहार देणं आणि पृथ्वीचं हित जपणं ही सरकारसमोरची प्रमुख उद्दिष्टं असल्याचं प्रतिपादन केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी या परिषदेत केलं.

राजनाथ सिंह

नवीन भारत दहशतवादाचा बळी ठरणार नाही, असा दृढ संदेश, ऑपरेशन सिंदूरनं दहशतवादी आणि त्यांच्या समर्थकांना दिला आहे. देश आता शक्ती आणि रणनीतीनं दहशतवादाचा सामना करेल असं प्रतिपादन संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी केलं. जम्मू आणि काश्मीरमधल्या उधमपूरमध्ये उत्तर मुख्यालयाच्या सैनिकांशी त्यांनी काल संवाद साधला. पाकिस्तान आणि पाक व्याप्त काश्मीर मध्ये दहशतवाद्यांचे तळ नष्ट करण्यामध्ये सशस्त्र दल आणि

गुप्तचर यंत्रणांची अचूकता, समन्वय आणि धाडसाचं त्यांनी कौतुक केलं. ऑपरेशन सिंदूर केवळ एक लष्करी कारवाई नसून, सीमारेषेद्वारे दहशतवादी आणि दहशतवादाला समर्थन करणाऱ्यांना एक इशारा असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.
सैनिकांनी शारीरिक आणि मानसिक आरोग्याकडे लक्ष देण्याचा सल्ला त्यांनी आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पूर्वसंध्येला दिला.

ऑपरेशन सिंधु

ऑपरेशन सिंधु अंतर्गत इराणमधून 290 भारतीय नागरिकांना घेऊन एक विमान काल रात्री नवी दिल्लीत पोहोचलं. इस्त्राइल आणि ईराण यांच्यातल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर बिघडत चाललेल्या परिस्थितीत भारतीय नागरिकांना बाहेर काढण्यासाठी ऑपरेशन सिंधु सुरू करण्यात आलं आहे. इराणमधल्या भारतीय नागरिकांना, तेहरानमधल्या भारतीय दूतावासाशी आणि नवी दिल्लीतल्या परराष्ट्र मंत्रालयाच्या 24 तास सुरू असलेल्या नियंत्रण कक्षाशी संपर्क साधण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

इराण-इस्त्रायल-जीनिव्हा

इराण आणि इस्त्रायल यांच्या दरम्यान सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभुमीवर, इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची आणि फ्रान्स, जर्मनी आणि ब्रिटनच्या समकक्ष मंत्र्यासह युरोपियन महासंघाच्या परराष्ट्र धोरण प्रमुखांची काल चर्चा झाली. येत्या दोन आठवड्यात इराणवरील हल्ल्याला पाठिंबा द्यायचा की नाही यावर निर्णय घेऊ असे वक्तव्य अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केले होते. त्या पार्श्वभुमीवर, तणाव अधिक वाढू नये या दृष्टीने युरोपियन नेत्यांनी इराणला वाटाघाटी करण्याचा पुनर्विचार करण्याचं आवाहन केलं आहे. इराणने, त्याच्या अणुकार्यक्रमावर आणि सीमा प्रश्नावर अमेरिकेसह चर्चा करण्याची तयारी दर्शवल्याचे या बैठकीनंतर नेत्यांनी सांगितले.

वारी

पंढरपूरच्या वारीसाठी निघालेल्या, संत श्री ज्ञानेश्वर महाराज आणि संत श्री तुकाराम महाराज यांच्या पालख्यांचं काल पुण्यनगरीत आगमन झालं. स्थानिकांनी पुष्पवृष्टी करून, रांगोळ्या काढून दोन्ही पालख्यांचे उत्साहात स्वागत केलं. राजकीय पक्ष आणि सामाजिक संस्थांनी वारकऱ्यांच्या सेवार्थ अन्नदान आणि इतर उपक्रम राबवून आपली सेवा अर्पण केली. आज तुकोबांच्या पालखीचा मुक्काम नाना पेठेतल्या निवडुंगा विठ्ठल मंदिरात आणि माऊलींच्या पालखीचा मुक्काम भवानी पेठेतील पालखी विठोबा मंदिरात असेल. उद्या सकाळी दोन्ही पालख्या पंढरपूरकडे मार्गस्थ होतील. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भवानी पेठेतील पालखी विठ्ठल मंदिरात संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज पादुकांचे दर्शन घेतले. मंदिरात त्यांच्या हस्ते पालखीची पूजा झाली.

कैलास मानसरोवर

कैलास मान सरोवर यात्रेला काल सिक्कीम इथून प्रारंभ झाला. सिक्कीमचे राज्यपाल ओमप्रकाश माथुर यांनी नथु ला मधून जाणाऱ्या 36 यात्रेकरूंच्या पहिल्या तुकडीला हिरवा झेंडा दाखवून रवाना केलं. नथु ला खिंडीच्या दुसऱ्या टोकाला चीनच्या अधिकाऱ्यांनी यात्रेकरुंचं स्वागत केलं. तिबेटच्या स्वायत्त प्रदेशातली कैलास मानसरोवर यात्रा पाच वर्षांच्या कालावधीनंतर यंदा होत आहे.

नीरज चोप्रा

भारतीय भालाफेकपटू नीरज चोप्राने पॅरिस डायमंड लीग 2025 मध्ये पुरूषांच्या भालाफेक स्पर्धेत विजय मिळवला. ऑलिम्पिकविजेत्या चोप्राने पहिल्याच प्रयत्नात 88 पूर्णांक 16 मीटर फेक करत विजेतेपदाला गवसणी घातली. जर्मनीचा ज्युलियन वेबर दुसऱ्या तर ब्राझीलचा लुईस मॉरिसियो तिसऱ्या क्रमांकावर राहिला.

क्रिकेट

इंग्लंडमधल्या हेडींग्ले इथं कालपासून भारत आणि इंग्लंड यांच्यातील तेंडुलकर-अँडरसन चषकाच्या मालिकेला सुरुवात झाली. पाच सामन्यांच्या या मालिकेतील पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात पहिल्या दिवशी भारताच्या 3 बाद 359 धावा झाल्या आहेत. तत्पूर्वी इंग्लंडने नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. के एल राहुल 42 धावांवर तर कसोटी पदार्पण करणारा साई सुदर्शन शून्यावर बाद झाला. सलामीवीर यशस्वी जयस्वालनं 101 धावा केल्या तर कर्णधार शुभमन गिल 127 आणि उपकर्णधार ऋषभ पंत 65 धावांवर खेळत आहेत.

आकाशवाणी पुणे केंद्रावरचं राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

नमस्कार